## संक्षिप्त वृत्त

### कॉलेजच्या पार्किंगमधून बुलेट पळवली

**सोलापूर** : अमृता आर्केड अपार्टमेंट वालचंद कॉलेज येथील पार्किंग मधून बुलेट क्रमांक एमएच.१३.डीए.२१५७ ही पार्क करून ठेवलेली असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १० ते ११ जुन दरम्यान घडली.याप्रकरणी सतीशकुमार सौदागर गुंड (वय-४३,रा.अमृता आर्केड अपार्टमेंट) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल शेख हे करीत आहेत.

### घरासमोरून चोरट्याने दुचाकी चोरली

**सोलापूर** : घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.बीएम.७८२५ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बुर्ला कॉलेज शेजारी साखर पेठ येथे दि.२९ जून रोजी घडली.याप्रकरणी मुस्तफा इस्माईल बागवान (वय-३६,रा.बुर्ला कॉलेज शेजारी) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस नाईक बाबर हे करीत आहेत.

### पार्क केलेली मोटरसायकल लंपास

**सोलापूर** : पार्क करून ठेवलेली मोटार सायकल क्रमांक एमएच.१३.बीए.०७६९ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना १ जुलै रोजी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास वालचंद कॉलेज समोर घडली.याप्रकरणी विशाल चंद्रकांत चौगुले (वय-२७,रा. जोशी गल्ली,रविवार पेठ) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हवालदार धुमाळ हे करीत आहेत.

### ब्रिजवरील अपघातात एकजण गंभीर

**सोलापूर** : बाळे ब्रिजवरील हायवे रोडवर अज्ञात वाहन चालकाने एकास कट मारून गंभीर दुखापत करत जखमी केल्याचे घटना १५ जून रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास घडली.याप्रकरणी तेजस लक्ष्मण राऊत (वय-३६,रा.सुरवसे नगर,कुमठा नाका,नई जिंदगी) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी यांचा भाऊ सुरज राऊत हा दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीआर.११२९ यावरून बाळे ब्रिजवरील हायवे रस्त्यावरून जात असताना अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणाने चालवून कट मारून अपघात करत, फिर्यादी यांच्या भावाला गंभीर जखमी करत न थांबता निघून गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार घुगे हे करीत आहेत.

### कबुतरासाठी मारहाण; तिघांवर गुन्हा

**सोलापूर** : कबुतरासाठी दगडाने मारहाण करून दमदाटी केल्याची घटना ३ जुलै रोजी शोभादेवी नगर येथे घडली.याप्रकरणी अमीर सैफान मुल्ला (वय-१७,रा. शोभादेवी नगर,नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून आजहर शेख,मझहर शेख,नसरीन शेख (रा. शोभादेवी नगर, नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी याने अझहर शेख याला त्याच्या घरासमोर जाऊन माझे कबूतर मला परत दे असे म्हणाले असता,त्याने मी कबूतर परत देणार नाही म्हणून शिवीगाळ करत मारहाण केली.त्यानंतर मझहर आणि नसरीन यांनी देखील शिवीगाळ करत मारहाण केली. नसरीन शेख याने फिर्यादीस खाली पाडले व अझहर शेख याने तेथे पडलेला दगड फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले.तसेच तू परत आला तर बाहेरील मुले बोलावून तुझे हात पाय तोडायला लावतो.अशी दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील आज सोलापुरात

**सोलापूर** : राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील हे दोन दिवस सोलापूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. शुक्रवारी (दि.५) पंढरपूर येथे सायं.७.३० वा. आगमन झाले. शुक्रवारी उशिरा त्यांनी काही कार्यक्रम केले. शनिवारी (दि. ६) सकाळी ०८.०० वा. शासकीय विश्रामगृह सोलापूर येथून शासकीय वाहनाने धाराशिवकडे प्रयाण करतील.

# जिल्हा परिषदेच्या निवडणुका रखडल्याने विकासकामे ठप्प

**● राज्यातील २४ जिल्हा परिषद, २८७ पंचायत समितींच्या मुदती २०२२ मध्येच समाप्त**

**सोलापूर/प्रतिनिधी**

**सोलापूरसह संपूर्ण राज्यभरातील २४ जिल्हा परिषदेच्या निवडणुका मागील दोन वर्षापासून ठप्प आहेत. २० मार्च २०२२ मध्येच त्यांच्या मुदती संपल्याने जिल्ह्याच्या व राज्याच्या विकास कामावर मोठा परिणाम झाला आहे.**



संबंधित २४ जिल्हा परिषदांवर प्रशासक केवळ बध्याच्या भूमिकेवर ठाम असल्याचे चित्र आहे. ग्रामीण भागातील विकासाच्या गाडा हा ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद यातील ग्रामस्थांच्या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून चालतो मात्र असे असताना राज्यातील २४ जिल्हा परिषदांच्या आणि २८७ पंचायत समितींच्या निवडणुका मागील दोन वर्षापासून झाल्या नसल्याने विकासाची दिशाच पलटली आहे. निवडणुका न होणे ही बाब लोकशाहीची जणू थट्टाच करीत आहे.

आज ना उद्या निवडणुका होतील या आशेवर बसलेले इच्छुक कार्यकर्ते डोक्याला बांधलेली बाशिंगे अक्षरक्ष: उतरून ठेवल्याचे दिसत आहे. नेत्यांच्या लोकसभा व विधानसभा निवडणुका झाल्यानंतरच कार्यकर्त्यांच्या निवडणुकांना मुहूर्त मिळेल असा अंदाज असताना नेत्यांच्या निवडणुका झाल्या मात्र कार्यकर्त्यांचे काय असा आता कार्यकर्त्यांमध्ये सूर निघत आहे. जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची मुदत २२ मार्च २०२२ रोजी संपली आहे. नियमानुसार सहा महिन्यात या निवडणुका होणे अपेक्षित होते. मात्र सरकारने कुठल्याही प्रकारचा विचार न करता तब्बल दोन वर्षापासून प्रशासकाची नेमणूक करून जणू हात झटकल्याचे दिसत आहे. महाविकास आघाडीच्या सरकारच्या काळात निवडणुकांसाठी हालचालींना वेग आला होता. त्यानूसार लोकसंख्या वाढीचा निकष ठेवून नव्याने गट व गण रचना करून त्यांची संख्या वाढवली होती. ज्या ठिकाणी ६० सदस्य होते, तेथे ६७ सदस्य झाले. जे ते ६७ सदस्य होते तेथे ७५ झालेत. त्यानुसार जुलै २०२२ मध्ये आरक्षण सोडतदेखील पूर्ण झाली होती. अशा प्रकारची सर्व व्यवस्था करून ठेवली असताना भाजपा सरकारने त्यावर अद्याप कुठलाही निर्णय न घेता मागील दोन वर्षापासून या सर्व प्रकारच्या निवडणुकांवर प्रशासक बसवले आहे. त्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात नाराजीचा सूर दिसत आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेच्या मुख्यालयात मागच्या महिन्यात अशाच प्रकारे माजी ज्येष्ठ सदस्य ॲड. सचिन देशमुख यांनी जिल्हा परिषद प्रशासनावर अतिशय नाराजी व्यक्त करत प्रशासक नेमण्यासंदर्भात आपण लवकरच माजी सदस्यांना एकत्र करून प्रशासकाविरोधात आवाज उठवणार असल्याचे बोलून दाखवले होते. जिल्ह्याच्या विकास कामांमध्ये केवळ टक्केवारीच जवळच्या नातेवाईकांना, एकाच ठेकेदाराला एकापेक्षा अधिक कामे, बिल वेळेवर न काढणे, डीबीटीच्या योजना व्यवस्थित न राबवणे अशा असंख्य प्रश्नावर त्यांनी पत्रकारांसमोर भावना व्यक्त केल्या होत्या.

प्रशासनाला न भेटता त्याने केवळ विविध विभागात जाऊन कामे कसे चालतात यावर प्रकाश टाकला होता. त्यावेळी त्यांनी प्रशासकावर नाराजी व्यक्त केली होती. आजही जिल्हा परिषद विकास कामांसंदर्भात केवळ कागदपत्रे आकडेवारी दाखवून पुढे आहे. प्रत्यक्षात ग्रामीण भागात फिरून पाहिले असता ५० ते ६० टक्के कामे व्यवस्थित झाली नसल्याचे विदारक चित्र पहायला मिळत आहे. याला वाली कोण ? अशा भावना सदस्यांनी व्यक्त केल्या लक्ष घालून प्रत्येक विभागाला सक्षम अधिकारी कसा मिळेल व जिल्ह्यातील रखडलेले विकास कामे तातडीने मार्गी कशी लागतील यावर भर देणे अपेक्षित आहे.

# जिल्ह्यात अतिसार थांबवा अभियानास प्रारंभ

## दोन महिन्यात गावोगावी विविध माध्यमातून जनजागृती

**सोलापूर/प्रतिनिधी**

अतिसाराचे प्रमाण वाढू नये म्हणून जिल्ह्यात जनजागृतीसाठी ३१ ऑगस्ट पर्यंत दोन महिन्यांचे अतिसार थांबवा (स्टॉप डायरिया) अभियान राबविण्यात येत आहे. या विशेष अभियानाचा प्रारंभ जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांच्याहस्ते शुक्रवारी (दि.५) करण्यात आला.



मनिषा आव्हाळे यांच्या दालनात झालेल्या कार्यक्रमप्रसंगी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) ईशाधिन शेळकंदे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अमोल जाधव, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनिल कटकधोंड, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन सोनकांबळे, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हट्टे, अर्चना कणकी, घनकचरा सल्लागार मुकूंद आकुडे, सांडपाणी सल्लागार प्रशांत दबडे, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, आनंद मोची , योगेश कुंभार आदी उपस्थित होते.

शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सोमवार १ जुलै पासून पुढील दोन महिने म्हणजे ३१ ऑगस्टपर्यंत अतिसार थांबवा हे अभियान राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील शाळा, अंगणवाडी, प्राथमिक आरोग्य केंद्र व सार्वजनिक ठिकाणी उपलब्ध होणाऱ्या पाण्याची तपासणी एफ.टी.के.द्वारे करण्यात येणार आहे. दूषित आढळलेले पाणी नमुने पुढील तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात येणार आहेत.

जिल्ह्यात सर्व तालुकास्तरावर या अभियानाची मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहेत. ग्रामपंचायत व इतर शासकीय यंत्रणा, सर्व विभाग या अभियानात सहभाग घेऊन आठवडा निहाय नियोजन केले आहे. गावपातळीवर पाणी समितीची स्थापना, बळकटीकरण समितीद्वारे गाव पातळीवर पाण्याचे स्तोत्र स्वच्छता, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत गावे ओडीएफ प्लस करणे, गाव पातळीवर कार्यात्मक नळ जोडणी करणआदीबाबत जनजागृती करण्यात येणार असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांनी सांगितले.

# पालकमंत्री पाटील यांचा सोलापूर जिल्हा दौरा

**सोलापूर** : राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्ये मंत्री तथा पालकमंत्री चंद्रकांत पाटील शनिवारी (दि.६) सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत.



सकाळी ७: १५ वा.शासकीय विश्रामगृह येथे आगमन व राखीव. सकाळी ०८.५० वा.शासकीय विश्रामगृह येथून वाहनाने प्रयाण व अनुसयाबाई रामचंद्र बुर्ला महिला महाविद्यालय, राजेंद्र चौक, येथे सकाळी ०९.०० वा. विद्यार्थिनींच्या कृतज्ञता मेळाव्यास उपस्थिती. सकाळी १०.१५ वा. वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालयकडे प्रयाण व स.१०.३० वा.जिल्हा नियोजन आराखड्याबाबत विभाग प्रमुखांची आढावा बैठकीस उपस्थिती.

दुपारी १२.४० वा. वाहनाने सेटलमेंट ग्राऊंडकडे प्रयाण व ०१.०० वाजता महिलांचा कृतज्ञता मेळाव्यास उपस्थिती. दुपारी २.१५ वा.शासकीय विश्रामगृह, सोलापूर येथे आगमन व राखीव. दुपारी ०३.०० वाजता पंढरपूरकडे प्रयाण. दुपारी ०४.३० कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय येथे आगमन व पंढरपूर आषाढी यात्रा-२०२४ नियोजनाबाबत आढावा बैठकीस उपस्थिती.

# बनावट सोने गहाण ठेवून बँकेची फसवणूक; तिघांना अटकपूर्व जामीन

**सोलापूर/प्रतिनिधी**

बनावट सोने गहाण ठेऊन बँकेची ८६ लाख रुपयांच्या फसवणूक प्रकरणात गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत नाही, असा आरोपींचे वकील ॲड.रियाज एन.शेख यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून येथील सत्र न्यायाधीश पी.एस. खुणे यांनी तीन आरोपींचा अटकपूर्व जामीन मंजूर केला.

अनिल कुमार बालाजी शहापूरवाड (रा.विजापूर रोड,सोलापूर) हे कॅनरा बँक,चाटी गल्ली,सोलापूर येथील बँकेचे चीफ मॅनेजर असून कॅनरा बँकेच्या सोलापुरात ४ शाखा आहेत. शाखांमध्ये सोने तारण कर्ज देण्याची सुविधा असून ही सुविधा घेण्याकरिता आरोपींनी कर्ज मागणी अर्ज केला. त्यानंतर गहाण ठेवणारे सोने हे बँकेचे सोनार सुनील वेदपाठक यांच्याकडून तपासून घेऊन त्याचे मूल्यांकन करून त्या आधारे १३ खातेदारांना विविध शाखांच्यामार्फत २४ तारण कर्ज प्रकरण मंजूर करून बँकेने एकूण ८५,९३,३०० इतक्या रकमेचे कर्ज दिले. नंतर ते सोने बनावट असल्याचे दिसून आल्याने फसवणूक केल्याचे निष्पन्न झाल्याने शहापूरवाड यांनी १३ जून २०२४ रोजी जोडभावी पेठ पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली. त्यानुसार जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात १४ आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल झाला. आरोपी जुबेर जगरीस मुल्ला,मुबारक जैनुद्दीन शेख,कदीर मलिक पठाण यांनी ॲड. रियाज एन. शेख यांच्या वतीने नुकत्याच लागू झालेल्या भारतीय नागरिक सुरक्षा संहिता या नवीन कायद्याच्या कलम ४८२ अन्वये अटकपूर्व जामीन अर्ज सत्र न्यायालयामध्ये सादर केला होता.

# लेप्रसी कॉलनी येथील जागेवर अतिक्रमण केल्यास कारवाई : लोकरे

**सोलापूर/प्रतिनिधी**

शहरातील लेप्रसी कॉलनी येथील विशिष्ठ संबंधित जागा सोलापूर महापालिकेच्या मालकीची असल्याने या जागेबाबत कोणीही काहीही व्यवहार करु नये. तसेच नेटीव्ह ख्रिश्चन स्मशानभुमी ट्रस्टच्या मंडळींनी या जागेवर कोणतेही अतिक्रमण व गैरवापर करु नये. अतिक्रमण केल्यास संबंधितांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी दिला आहे.

शहरातील कसबे सोलापूर,(ता.उत्तर सोलापूर) येथील लेप्रसी कॉलनी येथील नगर भूमापन अधिकारी सोलापूर यांचेकडील टी.पी.३, फा.प्लॉ.नं. २३, सि.स.नं. ५८ यामधील १५ हे. ९६ आर. ही जमीन जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडील आदेश क्र. आर आर.बी.आय/डेस्कर/सिटीएस आपसे ९४/ए आर ६८ ही सोलापूर महापालिकेस कब्जा दिलेली आहे. सध्या जागेवर सोलापूर महानगरपालिकेचा कब्जा आहे. या जागेपैकी जुना स.नं. ७२८, नवीन स.नं. २३१ क्षेत्र १ हेक्टर २१ आर. या जमिनीवर धर्मादाय आयुक्त, उपायुक्त सोलापूर यांच्याकडील बदल अर्ज ५७३/१७ दि.११ मे २०१७ अन्वये या जमिनीवरील रे.एल.एस. गेट सो हे नाव बदलून अध्यक्ष नेटीव्ह ख्रिश्चन स्मशान भुमी ट्रस्ट अशी नोंद फेरफार क्र. २४११८ दि.१७ जुलै २०२७ ने जुना ७/१२ उतारावर नोंद केलेली आहे. ही जागा ही नगर भूमापन हद्दीत येत असताना जुना ७/१२ उताऱ्यावर जी नोंद केली त्याबाबत उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र. १, सोलापूर यांचेकडे फेरफार क्र. २४११८ दि.१७/०७/२०२७ च्या नोंदीविरुध्द अपिल दाखल केले होते. सदरहु अर्ज मंजुर झाल्याचे त्यांनी सांगितले.



# अशोकनगर परिसरातील अतिक्रमण हटविले

**● दोन खोके, चारचाकी हातगाडी जप्त**

**सोलापूर/प्रतिनिधी**

विजापूर रोडवरील अशोक नगर परिसरातील मागासवर्गीय मुला-मुलींच्या वसतिगृहासमोरील अतिक्रमण शुक्रवारी (दि.५) काढण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली.

आयुक्त शितल तेली-उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने शहरात सातत्याने अतिक्रमण विरोधी मोहीम राबविण्यात येत आहे. विजापूर रोडवरील फुटपाथवर अनधिकृतपणे रहदारीस अडथळा येईल अशा प्रकारे भाजी आणि फळ विक्री करणाऱ्या विरोधात महापालिकेच्या पथकाकडून रोज कारवाई करण्यात येत आहे. दरम्यान, शुक्रवारी अतिक्रमण प्रतिबंधक पथकाने विजापूर रोड येथील अशोकनगर परिसरातील मुला-मुलींच्या मागासवर्गीय वसतीगृहासमोर असलेले अतिक्रमण काढले.

अनधिकृतपणे खोके आणि चार चाकी हातगाडी लावण्यात आली होती. वसतीगृहासमोरील दोन लोखंडी खोके आणि एक चार चाकी हात गाडी जप्त करण्यात आली. तर जेसीबीच्या साह्याने एक लोखंडी खोका निष्कासित करण्यात आला.

# गोरगरिबांना घास भरविण्याची 'आस्था'

## उपाशीपोटी झोपणारे आता सोलापुरात विरळाच!

**सोलापूर/प्रतिनिधी**

**शहरात आठ वर्षांपासून गोरगरिबांच्या जिव्हाळ्याची झालेली एक संस्था चांगलीच नावारूपाला येत आहे. आस्था सामाजिक फाउंडेशन असे तिचे नाव असून तिच्यामुळे कोणालाही उपाशीपोटी झोपण्याची वेळ येत नाही, असे सुखद चित्र आहे.**

आठ वर्षांपुर्वी आस्था सामाजिक संघटने अंतर्गत विजय छंचुरे यांनी आस्था रोटी बँकेची स्थापना केली. या रोटी बँकेमार्फत गरीब-निराधार लोकांना एकवेळच्या जेवणाची व्यवस्था केली जाते.

समाजात एकीकडे अन्नाचा तुटवडा भासत आहे. तर दुसरीकडे अन्न वाया जात आहे. हे वाया जाणारे अन्न गरजूपर्यंत पोचविण्याचे काम आस्था रोटी बँकेने गेल्या आठ वर्षांपासून करत आहे. ही संस्था केवळ अन्नदान करणारी संस्था म्हणून नावारुपास येत नसून दुष्काळ असो पूर परिस्थिती किंवा रोग सर्व संकटामध्ये गरीब दिनदुबळ्या लोकांच्या सेवेत निस्वार्थपणे सहभागी असते.

एवढेच नाही तर शाळा, महामंडळे, बालकल्याण, मानव सेवा संस्था, मानसिक आरोग्य दवाखाने या सारख्या ठिकाणीही आपली सेवा पुरवण्यास आस्था तत्पर असते. जी अनाथ मुले शिक्षण घेतात त्यांना कपड्याचे वाटप, चप्पल पुरविणे तसेच सोलापूरमध्ये श्री सिद्धेश्वर यात्रा त्यांना पूर्ण फरवून दाखवणे. त्या मुलांना आनंद कसा होईल याची काळजी घेण्याचे कामही आस्था फाउंडेशन रोटी बँकेमार्फत करीत असते.



### ● चाळीस शिलेदारांचा संघ

आस्था फाउंडेशनमध्ये विजय छंचुर, नीलिमा हिरेमठ, कांचन हिरेमठ, छाया गंगणे, स्नेहा मेहता, स्नेहा वनकुद्रे, पुष्कर पुकाळे, मंगल पांढरे, सोलापूरकर, निनाद आकतनाळ, आकाश तालीकोटी, राहुल कुरकुट, विद्या माने, सुरेखा पाटील आदी ४० कार्यकर्ते संस्थेची सेवा देण्यात गुंतले आहेत.

गेली ८ वर्षे झाली आम्ही आस्था फाउंडेशन मार्फत करतो. या संस्थेचे उद्देश असा की पुढल्या काळात आम्ही समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत त्यांना मदत करण्याचे व कोणी उपाशी राहू नये भुकेल्याला अन्नदान करायची हेच आमचे काम आहे.

**- विजय छंचुरे,** आस्था फाउंडेशन अध्यक्ष

### सामाजिक कार्यातही अग्रेसर

- आस्था रोटी बँकेतर्फे अन्नदानासह अन्यही सामाजिक कामात आघाडी घेतली आहे. सिव्हिल हॉस्पिटलमध्ये रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्यात येते.
- गोरगरीब, आबाल वृद्ध व निराधार महिलांना रोज अन्नदान
- भटकणाऱ्या व उघड्या अंगाने फिरणाऱ्यांना निवारा व वस्त्रदान
- वृद्धाश्रमातील वृद्धांना तीर्थक्षेत्र भेट घडवण्यासाठी दर्शनाची सोय
- झोपडपट्टीतील आजी-आजोबांना मोफत नेत्र शिबीर व मोफ ऑपरेशन

### ● या ठिकाणी अन्नदानाची सेवा

सिव्हिल हॉस्पिटल, भगवानदास झोपडपट्टी, श्रीशैल नगर, गांधीनगर झोपडपट्टी, मित्रनगर, संगमनगर झोपडपट्टी, कुष्ठरोग वसाहत, घोंगडे वस्ती परिसर आदी झोपडपट्ट्यांमध्ये निराधार महिलांना मोफत अन्नदान करण्यात येते.

### ● रोज ३५० जणांची क्षुधाशांती

जे लोक बेघर आहेत, ज्या हातांना काम नाही, अशा ३५० जणांना दररोज मोफत अन्नदान केले जाते. तसेच निराधार महिलांनाही अन्नदान करण्यात येते.

### ● आस्था फाउंडेशनचा उद्देश

भुकेल्यांना अन्नदान, समाजातील गरीब, गरजू लोकांना आर्थिक मदत, अनाथ मुलांना कपड्यांचे वाटप, कोणी उपाशी राहू नये; भुकेल्याला अन्नदान हेच आमचे उद्देश असल्याचे फाउंडेशनच्यावतीने सांगितले जाते.